**नवे वर्ष**

शाळेचे नवे वर्ष
म्हणजे जोशू फुलून जायचा !

नवे वर्ष, नवी पुस्तके नि वह्या
पुस्तकांच्या नवेपणाचा वास
कितीतरी दिवस पुरायचा !

पहिला पाऊस नि छत्रीशी मैत्री
तापल्या जमिनीचा विरघळणारा वास
जोशूचा दिवस भरून जायचा !

पण आता रोज शाळेत जायचे
ओळीत बसून बाकांवर शिकायचे
जोशूला हे मात्र नकोसे वाटायचे !

काय हवे, काय नको
हे जोशूला आता नीट जाणवायचे!